# मुंबई विद्यापीठ

क्र.का.प्रा.वि./ आयसीडी/२०२४-२५/३३

व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०२४-२५ मधील

## दिनांक ९ मे, २०२४ च्या बैठकीचे इतिवृत्त

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०२४-२५ मधील दुसरी सभा गुरुवारी दिनांक ९ मे, २०२४, रोजी सकाळी ११:०० वाजता सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२ येथे आयोजित करण्यात आली होती.

बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| अनु. क्र. | माननीय सदस्यांचे नाव | पदनाम | उपस्थिती/ अनुपस्थिती |
|---|---|---|---|
| १ | प्रा. रविंद्र कुलकर्णी ( कुलगुरु) | अध्यक्ष | उपस्थित |
| २ | प्रा. अजय भामरे (प्र-कुलगुरू) | सदस्य | उपस्थित |
| ३ | डॉ. शेषाद्री चारी | सदस्य | उपस्थित |
| ४ | डॉ. अनिल कुमार सिंग (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ५ | डॉ. कविता लघाटे (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ६ | प्रा. शिवराम गर्जे | सदस्य | उपस्थित |
| ७ | श्री. संदीप सिंग | सदस्य | उपस्थित |
| ८ | सचिव, उच्च व शिक्षण विभाग | सदस्य | अनुपस्थित |
| ९ | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| १० | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| ११ | डॉ. बळीराम गायकवाड (प्रभारी कुलसचिव) | सदस्य सचिव | उपस्थित |
| १२ | (सी.ए.) हर्षल वाघ ( प्रभारी वित्त व लेखा अधिकारी ) | निमंत्रित | उपस्थित |
| १३ | डॉ. पूजा रौंदळे (संचालक, प.व.मु.मं.) | निमंत्रित | उपस्थित |

**स्वागत** : सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करून मा.अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विंनती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करून सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

श्रद्धांजली

**दादा परसरनाईक**

मराठी रंगभूमीवरील प्रसिद्ध पार्श्वसंगीतकार दादा परसरनाईक यांचे दिनांक २७ एप्रिल, २०२४ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८० वर्षांचे होते.

**दिलीप नाईक**

ज्येष्ठ दिग्दर्शक दिलीप नाईक यांचे दिनांक ०७ मे, २०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

माननीय सर्व सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहिली.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| १ | दिनांक २७ एप्रिल, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | दिनांक २७ एप्रिल, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले. | |
| २ | विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांनी College Development Committee ची स्थापना न केल्यामुळे नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | असा ठराव पारित करण्यात आला की अधिष्ठाता मंडळाच्या दिनांक ७ मार्च २०२४, बाब क्रमांक २.१४ अन्वये विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांनी College Development Committee ची स्थापना न केल्यामुळे नियमानुसार कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>या बाबत तात्काळ सर्व संबंधित महाविद्यालयांना परिपत्रक निर्गमित करण्यात यावे कि वारंवार सूचना देऊन हि ज्या महाविद्यालयानी "महाविद्यालय विकास समिती" (CDC) गठीत केली नाही. त्यांनी College Development Committee समितीची स्थापना करावी आणि तसा अहवाल दहा दिवसाच्या आत मुंबई विद्यापीठास पाठवावा. ज्या महाविद्यालयांनी College Development Committee ची स्थापना अगोदरच केली आहे त्यांनी मागील एक वर्षाचा अहवाल पुढील दहा दिवसात विद्यापीठास पाठवावा. जे महाविद्यालया वरील दोन्ही पैकी काहीही करणार नाहीत अशा महाविद्यालयांवर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल व अशा महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून प्रथम वर्षाचे विदयार्थी प्रवेश देण्यास बंदी करण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले. | |

| | | |
|---|---|---|
| ३ | सोबत प्राचार्य, वाटुमल इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स इंजिनियर अँड कम्प्युटर टेक्नॉलॉजी वाटुमल इन्स्टिटयूट प्लॉट नं. १५७ उल्हासनगर रेल्वे स्टेशन समोर, सी.एच.एम. कॅम्पस, उल्हासनगर -३, उल्हासनगर (प.),जि.ठाणे- ४२१ ००३ या इंस्टीट्यूटचे पत्र क्र.WI/UOM/AICTE/2024-25/536 दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२४ अन्वये **"वाटूमल इन्स्टिटयूट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी"** च्या ऐवजी **"वाटुमल इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी"** (Watumal Institute of Engineering and Technology) असा इन्स्टिटयूटच्या नावात बदल करण्याबाबत प्रस्ताव. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | असा ठराव पारित करण्यात आला कि, वाटुमल इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स इंजिनियर अँड कम्प्युटर टेक्नॉलॉजी वाटुमल इन्स्टिटयूट प्लॉट नं. १५७ उल्हासनगर रेल्वे स्टेशन समोर, सी.एच.एम. कॅम्पस, उल्हासनगर -३, उल्हासनगर (प.),जि.ठाणे- ४२१ ००३ या इंस्टीट्यूटचे **"वाटूमल इन्स्टिटयूट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी"** च्या ऐवजी **"वाटुमल इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी"** (Watumal Institute of Engineering and Technology) असा इन्स्टिटयूटच्या नावात बदल करण्यास खालील अटीवर मान्यता देण्यात आली.<br>१) नावात बदल करण्यासाठी २५,०००/- (पंचवीस हजार रुपये फक्त) शुल्क घेण्यात यावे.<br>२) एल. आय. सी. निकष लागू करणे.<br>३) अफिलेशन शुल्क व इतर शुल्क भरल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे.<br>४) प्राचार्य, शिक्षकांना व कर्मचाऱ्यांना नियमित पगार दिल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे.<br>५) महाविद्यालयाचे नॅक मुल्याकंन करून घेण्याचे हमीपत्र घेण्यात यावे.<br>६) सी.डी.सी. स्थापन केल्याबद्दल माहिती/पूर्तता घेण्यात यावी.<br>७) विद्यापीठाची संबंधित सर्व शुल्क/ थकबाकी जमा झाल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे .<br>८) रिसर्च सेंटर व तत्सम संबंधी शुल्क भरल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे.<br>९) अकॅडमिक ऑडिट पोर्टल वर माहिती भरल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे.<br>महाविद्यालयाने उपरोक्त अटीची पूर्तता केल्यानंतरच सदर प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावा. | |
| ४ | वाटुमल इन्स्टिटयूट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स इंजिनीरिंग अँड कम्प्युटर टेक्नॉलॉजी, वाटुमल इन्स्टिटयूट प्लॉट नं. १५७, उल्हासनगर रेल्वेस्टेशन समोर, सीएचएम कॅम्पस, उल्हासनगर (पूर्व), जि. ठाणे- ४२१ ००३ या महाविद्यालयाचा बी.इ. (इन्स्टुमेन्टेशन इंजिनियरिंग) हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१९-२० या वर्षापासून बंद करण्यासाठीचा स्थानिक चौकशी समितीचा अहवाल. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | याबाबत सखोल चर्चा करण्यात आली आणि असे ठरले कि सदर प्रकरणात उशीर का झाला याचा खुलासा विभागाने करावा, तसेच अशा प्रकारचे किती प्रकरणे विभागात प्रलंबित आहेत याची हि माहिती पुढील व्यवस्थापन परिषदे समोर सादर करण्यात यावी. | |

| | | |
|---|---|---|
| | वाटुमल इन्स्टिटयूट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स इंजिनीरींग अँड कम्प्युटर टेक्नॉलॉजी, वाटुमल इन्स्टिटयूट प्लॉट नं. १५७, उल्हासनगर रेल्वेस्टेशन समोर, सीएचएम कॅम्पस, उल्हासनगर (पूर्व), जि. ठाणे- ४२१ ००३ या महाविद्यालयाचा बी.इ. (इन्स्टुमेन्टेशन इंजिनियरिंग) हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१९-२० या वर्षापासून बंद करण्यास खालील बाबींची पूर्तता करण्याच्या अटीवर मान्यता देण्यात आली.<br>१) सदर संस्थेमधील संबंधित सर्व शिक्षक व शिकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन/देयके दिले असल्याचे लिखित प्रमाणपत्र घेण्यात यावे.<br>२) विद्यापीठाची संलग्नता शुल्क किंवा इतर शुल्क जमा झाल्याची खात्री करून प्रमाणपत्र घेण्यात यावे.<br>३) ए.आय.सी.टी.इ. मार्गदर्शक तत्वानुसार सर्व प्रकिया पूर्ण केलेली असावी.<br>४) अकॅडमिक ऑडिट पोर्टलवर नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र घ्यावे.<br>५) परीक्षा विभागाशी संबंधित काही कागदपत्रे असतील, तर ते सर्व जमा करण्यात यावे.<br>६) विद्यापीठाची संबंधित सर्व शुल्क/ थकबाकी जमा झाल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे. | |
| ५ | राज्यस्तरीय संस्थामधील विविध विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात असलेल्या महाविद्यालयांमधील प्राचार्य, सहायक प्राध्यापक नियुक्ती करावयाच्या निवड समितीबाबत. | महाविद्यालय शिक्षक मान्यता कक्ष |
| ठराव | राज्यस्तरीय संस्थामधील विविध विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात असलेल्या महाविद्यालयांमधील प्राचार्य, सहायक प्राध्यापक नियुक्ती करावयाच्या निवड समितीबाबत शासन निर्णय क्र. वेतन-२०१८/प्र.क्र.५६/विशि-१, दिनांक: १ जानेवारी,२०२४ प्रमाणे तात्काळ विद्यापीठाचे परिपत्रक निर्गमित करण्यात यावे. आणि संबंधित महाविद्यालयास स्वतंत्र पत्राद्वारे कळविण्याची व्यवस्था करावी. | |
| ६ | अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ किरबेट, अॅड पो. किरबेट, ता. संगमेश्वर, जि.रत्नागिरी या संस्थेचे शिक्षण प्रसारक मंडळ किरबेट कला व वाणिज्य महाविद्यालय, अॅट/ पो.साखरपा, ता. संगमेश्वर, जि.रत्नागिरी - ४१५ ८०१ हे महाविद्यालय विश्वास शिक्षण मंडळ, यशवंतनगर, चिखली, ता. शिराळा. जि. सांगली या संस्थेस हस्तांतर करण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावाचा स्थानिक चौकशी समितीचा अहवाल. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | शिक्षण प्रसारक मंडळ किरबेट, अॅड पो. किरबेट, ता. संगमेश्वर, जि.रत्नागिरी या संस्थेचे शिक्षण प्रसारक मंडळ किरबेट कला व वाणिज्य महाविद्यालय, अॅट/ पो.साखरपा, ता. संगमेश्वर, जि.रत्नागिरी - ४१५ ८०१ हे महाविद्यालय विश्वास शिक्षण मंडळ, यशवंतनगर, चिखली, ता. शिराळा. जि. सांगली या संस्थेस हस्तांतर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | **आयत्या वेळी आलेली बाब** | |
| ७ | मुद्रणालयातील कर्मचाऱ्यांना सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती देण्याबाबत मुंबई विद्यापीठ मुद्रणालय यांचे दि. ०८ एप्रिल, २०२४ रोजीच्या पत्रातील मागणीनुसार सदर बाब सादर. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | सदर बाब वित्त व लेखा समिती समोर सादर करण्यात यावी. तद्नंतर वित्त व लेखा समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यात यावा. | |
| ८ | Centre for Distance and Online Education (CDOE) will be developing and implementing the PG & UG admission and related activities, on E-Samarth Portal, for this Eight IT Personnel namely Level 1 | Centre for Distance and Online |

| | | |
|---|---|---|
| | personnel :- 4 nos., Level 2 personnel :- 2 nos. Level 3 personnel: - 2 Nos. are to be procured form National Informatics Centre (NIC), through Department of Information and Computer Technology (DICT), University of Mumbai. | Education |
| ठराव | याबाबत असे ठरले कि, सेन्टर फोर डिस्टन्स अँड ऑनलाईन एज्युकेशन (CDOE) यांना लागणाऱ्या तांत्रिक कामाचे स्वरूप, सदर पदांची शैक्षणिक अहर्ता, अनुभव, वेतन आणि कालावधी बाबत विस्तृत माहिती वित्त व लेखा समिती कडे सादर करावी. वित्त व लेखा समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदे समोर सादर करावा. | |
| ९ | लेट श्री. विष्णू वामन ठाकूर चॅरीटेबल ट्रस्टचे] विवा भास्कर वामन ठाकूर कॉलेज ऑफ सायन्स] यशवंत केशव पाटील कॉलेज ऑफ कॉमर्स] विद्या दयानंद पाटील कॉलेज ऑफ आर्टस्] सर्वे नं. ३१४] विवा कॉलेज रोड] विरार (प)] जि. पालघर - ४०१ ३०३ या महाविद्यालयाच्या पत्त्यात बदल करण्यासाठी प्रस्ताव. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | लेट श्री. विष्णू वामन ठाकूर चॅरीटेबल ट्रस्टचे, विवा भास्कर वामन ठाकूर कॉलेज ऑफ सायन्स, यशवंत केशव पाटील कॉलेज ऑफ कॉमर्स, विद्या दयानंद पाटील कॉलेज ऑफ आर्टस्, सर्वे नं. ३१४, विवा कॉलेज रोड, विरार (प), जि. पालघर - ४०१ ३०३ या महाविद्यालयाच्या पत्त्यात बदल करण्यासाठी २५,०००/- शुल्क घेण्यात यावे व शासनास कळविण्यात यावे, असे ठरले. | |
| १० | भारती विद्यापीठाचे **इन्स्टिटयूट ऑफ हॉटेल अँन्ड टुरिझम मॅनजमेंट स्टुडीज, सेक्टर नं. ८, सी.बी.डी. नवी मुंबई - ४०० ०६१५,** या महाविद्यालयाचे पत्र क्र.BV/CHTMS/587/2019-20, dated 06/02/2020 रोजीच्या पत्रानुसार महाविद्यालयाच्या नावात बदल करण्याबाबतचा प्रस्ताव. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | असा ठराव पारित करण्यात आला कि, **भारती विद्यापीठ इन्स्टिट्युट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँन्ड केटरिंग टेक्नॉलॉजी** च्या ऐवजी **भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ हॉटेल अँन्ड टुरिझम मॅनेजमेंट स्टडीज** असा नावात बदल करण्यास खालील अटीवर मान्यता देण्यात आली.<br>१) नावात बदल करण्यासाठी २५,०००/- (पंचवीस हजार रुपये फक्त) शुल्क घेण्यात यावे.<br>२) एल. आय. सी. निकष लागू करणे.<br>३) अफिलेशन शुल्क व इतर शुल्क भरल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे.<br>४) प्राचार्य, शिक्षकांना व कर्मचाऱ्यांना नियमित पगार दिल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे.<br>५) महाविद्यालयाचे नॅक मुल्यांकन करून घेण्याचे हमीपत्र घेण्यात यावे.<br>६) सी.डी.सी. स्थापन केल्याबद्दल माहिती/पूर्तता घेण्यात यावी.<br>७) विद्यापीठाची संबंधित सर्व शुल्क/ थकबाकी जमा झाल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे .<br>८) रिसर्च सेंटर व तत्सम संबंधी शुल्क भरल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे.<br>९) अकॅडमिक ऑडिट पोर्टल वर माहिती भरल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे.<br>महाविद्यालयाने उपरोक्त अटीची पूर्तता केल्यानंतरच सदर प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावा. | |

| | | |
|---|---|---|
| ११ | कार्याध्यक्ष, न्यू एज्युकेशन सोसायटी, आर्ट्स, कॉमर्स अँन्ड सायन्स कॉलेज लांजा, झापडे - कांते रोड, ता. लांजा, जि. रत्नागिरी - ४१६ ७०१ या महाविद्यालयाचे पत्र क्र. रोजीच्या पत्रानुसार महाविद्यालयाच्या नावात बदल करण्याबाबत प्रस्ताव. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | असा ठराव पारित करण्यात आला कि, न्यू एज्युकेशन सोसायटीचे **New Education Society's, Arts, Commerce & Science College Lanja, Zapade – Kante Road, Taluka Lanja, Dist. Ratnagiri – 426 701** च्या ऐवजी **New Education Society's, Shriram Kusumtai Sadashiv Vanjare College, Lanja, Zapade – Kante Road, Taluka Lanja. Dist. Ratnagiri – 416 701** असा नावात बदल करण्यास खालील अटीवर मान्यता देण्यात आली.<br>१) नावात बदल करण्यासाठी २५,०००/- (पंचवीस हजार रुपये फक्त) शुल्क घेण्यात यावे.<br>२) एल. आय. सी. निकष लागू करणे.<br>३) अफिलेशन शुल्क व इतर शुल्क भरल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे.<br>४) प्राचार्य, शिक्षकांना व कर्मचाऱ्यांना नियमित पगार दिल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे.<br>५) महाविद्यालयाचे नॅक मुल्याकंन करून घेण्याचे हमीपत्र घेण्यात यावे.<br>६) सी.डी.सी. स्थापन केल्याबद्दल माहिती/पूर्तता घेण्यात यावी.<br>७) विद्यापीठाची संबंधित सर्व शुल्क/ थकबाकी जमा झाल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे .<br>८) रिसर्च सेंटर व तत्सम संबंधी शुल्क भरल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे.<br>९) अकॅडमिक ऑडिट पोर्टल वर माहिती भरल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे.<br>महाविद्यालयाने उपरोक्त अटीची पूर्तता केल्यानंतरच सदर प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावा. | |
| १२ | (अ) उपलब्ध असलेले पत्र क्र.AD/Gr.II/B/F&AC/21 दिनांक: ०६ ऑक्टोबर, २००६ नुसार फोर्ट परिसरातील, दिक्षांतसभागृह, फोर्ट ग्रंथालय, राजाबाई टॉवर व त्या बाहेरील लॉन<br>(1) University Departments.<br>(2) Affiliated Education Institutions.<br>(3) Non Govt. Organisation,<br>(4) Corporates यांना भाडे तत्वावर देण्यात येतात.<br>तरी उपरोक्त व्यवसायिक (Commercial) वापराकरिता (Photo, Shooting etc.) यांना देण्याकरिता बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.<br><br>(ब) तसेच Corporates यांना दिक्षांत सभागृह, फोर्ट ग्रंथालय, राजाबाई टॉवर व त्या बाहेरील लॉन इत्यादी कार्यालयीन कामाचा अर्धा, पूर्ण दिवसाकरिता तसेच शनिवार / रविवार व सुट्टीच्या दिवशी अर्धा, पूर्ण दिवसांकरिता पायाभूत सुविधा, नियोजन, अंमलबजावणी व देखभाल विभागाने ठरविल्याप्रमाणे भाडे मान्य करण्यासाठी वरील | |

| | | |
|---|---|---|
| | बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेकरिता सादर.<br>वरील (अ) व (ब) मान्यतेसाठी सादर. | |
| ठराव | याबाबत असे ठरले की चित्रीकरणासाठी किंवा फोटोशूट साठी जागा भाडयाने देण्यासाठी इतर कार्यालयात काय अटी शर्ती आहेत याची माहिती विभागाने तात्काळ घ्यावी. उदाहरणार्थ : महानगर पालिका, रेल्वे, गोरेगाव फिल्मसिटी, बेस्ट, शासकीय वास्तूसंग्रहालय, खालसा महाविद्यालय, इत्यादी. सर्व माहिती घेऊन सदर बाब व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यात यावी. | |
| १३ | विद्या परिषदेच्या दिनांक २० एप्रिल २०२४ बाब क्रमांक ९. अन्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिताचे विद्यापीठातील मानवविज्ञान विद्याशाखा, विज्ञान विद्याशाखा, वाणिज्य विद्याशाखा आणि आंतरविद्याशाखीय विद्याशाखा अंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी सत्र व्यवस्था (Arrangement of Terms) (परिशिष्ठानुसार) व्यवस्थापन परिषदेच्या मंजुरीसाठी सादर. | |
| ठराव | विद्या परिषदेच्या दिनांक २० एप्रिल २०२४ बाब क्रमांक ९. अन्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिताचे विद्यापीठातील मानवविज्ञान विद्याशाखा, विज्ञान विद्याशाखा, वाणिज्य विद्याशाखा आणि आंतरविद्याशाखीय विद्याशाखा अंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी सत्र व्यवस्था (Arrangement of Terms) (परिशिष्ठानुसार) सर्वानुमते मंजूर करण्यात आली. | |
| १४ | विद्यापरिषदेच्या दिनांक २० एप्रिल, २०२४ रोजीच्या सभेमध्ये बाब क्रमांक 5.2(N), 5.3(N), 5.7(N), 5.8(N), 5.9(N), 6.8(A), 7.6(N), 7.12(N), 8.1(N), 8.3(N), 8.4(N), 8.5(N), 8.6(N), 8.10(A), 8.11(A), 8.12(A), 8.13(A), 8.15(N), 8.16(N), 8.17(N), 8.23(N), 8.24(N, 8.27(N), 8.29(N), 8.33(N), 8.34(N) वर केलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. | |
| ठराव | विद्यापरिषदेच्या दिनांक २० एप्रिल, २०२४ रोजीच्या सभेमध्ये खालील बाब क्रमांक व्यवस्थापन परिषदेमध्ये सर्वानुमते मंजूर करण्यात आली.<br>1) 5.2 (N) - to amend the Regulation of standard of passing for **Master of Human Capital Management and Employees Relations (MHCM & ER) from 50% to 40% for each head of passing.**<br>2) 5.3 (N) - to introduce B.A. (Film, Television and New Media Production) Sem I & II.<br>3) 5.7 (N) - to introduce B.A. (Economics) Sem I & II.<br>4) 5.8 (N) - to introduce B.A. (Sociology) Sem I & II.<br>5) 5.9 (N) - to introduce M.A. (Political Science) Sem I & II.<br>6) 6.8 (A) – The amendment of new following branches in O.3701 and equivalence syllabus.<br>7) 7.6 (N) - to introduce B.Com. (Travel & Tourism) Sem I & II.<br>8) 7.12 (N) - **the nomenclature of the existing BMS program be changed as B.Com. (Management Studies).** | |

| | | |
|---|---|---|
| | 9) 8.1 (N) - to introduce B. Sc. (Hospitality Studies) Sem I & II.<br>10) 8.3 (N) - to introduce Master of Performing Arts (Dance) Sem I & II.<br>11) 8.4 (N) - to introduce Master of Performing Arts (Human Movement) Sem I & II.<br>12) 8.5 (N) - to introduce B.P.A. Dance Sem I & II.<br>13) 8.6 (N) - for amendment of R.9452 relating to standard of passing for PG Diploma in Proficiency in Playback Singing and Stage Performance.<br>14) 8.10 (A) - Regulation for ATKT of PG Diploma in Proficiency in Playback Singing and Stage Performance.<br>15) 8.11 (A) - Regulation for ATKT of B.P.A. (Music-Hindustani Vocal/ Sitar.<br>16) 8.12 (A) - Regulation for B.P.A. (Music- Tabla).<br>17) 8.13 (A) - Regulation for ATKT of M.P.A. (Music-Hindustani Vocal).<br>18) 8.15 (N) - to introduce M.A (Keertanashastra) Sem I & II.<br>19) 8.16 (N) - to introduce Diploma in Discover Your Roots: Exploring the culture, philosophy and practices of Sanatan Dharma.<br>20) 8.17 (N) - to introduce Diploma in The Gita Lens: Looking at life and its challenges through the lens of the Bhagavad Gita.<br>21) 8.23 (N) – to introduce M.Sc. (Home Science - Community Resource Management).<br>22) 8.24 (N) – to introduce B. A. (Fashion Designing) Sem I & II.<br>23) 8.27 (N) – to introduce B. Sc. (Maritime Hospitality Studies) Sem I & II.<br>24) 8.29 (N) – to introduce B. Sc. (Sports Management) Sem I & II.<br>25) 8.33 (N) – to introduce B.Sc. (Geology) Sem I & II.<br>26) 8.34 (N) - to introduce New Programme B. A (Fashion Designing) Sem I and II (CBCS) | |

कुलसचिवांनी सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

Balirams
16.05.2024

कुलसचिव (प्र)

प्र- कुलगुरू

मां. कुलगुरू

DR-EA : Prepare ATR